25 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा कौशल्य विकासासाठी हुबळीच्या ट्रस्टसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला, रोजगार क्षमतेला आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट, हुबळी (कर्नाटक) यांच्यात नुकताच त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला.



या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास, पुनर्कौशल्य (Reskilling) आणि कौशल्यवर्धन (Upskilling) यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देऊन त्यांची रोजगार क्षमता, व्यावसायिक क्षमता आणि करिअरसाठीची तयारी अधिक सक्षम करणे, हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. नायक म्हणाले, देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचा 'देशपांडे स्किलिंग' हा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, त्याचे मुख्यालय हुबळी (कर्नाटक) येथे आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. प्रामुख्याने आवश्यक व्यक्तिमत्त्व विकास व औद्योगिक कौशल्ये या अनुषंगाने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार असून, विद्यापीठाच्या 'कुशल, सक्षम आणि उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्मिती' या उद्दिष्टाला निश्चितच बळकटी मिळेल. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या कामी हा करार महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

या सामंजस्य करारावर श्री. नायक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संचालक डॉ. सागर डेळेकर, रवी चव्हाण, एम. बी. शेख, रवी डोळी, डॉ. हेमराज यादव, सुभाष माने यांच्यासह तिन्ही संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

2 5 JUL 2026 जनप्रवास

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठ, एसयूके-आरडीएफ आणि हुबळी येथील देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट यांच्यात कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला. कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि एम.एन. नायक आदी.

# शिवाजी विद्यापीठाचा कौशल्य विकासासाठी हुबळीच्या ट्रस्टसमवेत सामंजस्य करार

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला, रोजगार क्षमतेला आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनीएसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट, हुबळी (कर्नाटक) यांच्यात नुकताच त्रिपक्षीय सामंजस्य करार केला.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास, पुनर्कौशल्य आणि कौशल्यवर्धन यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देऊन त्यांची रोजगार क्षमता, व्यावसायिक क्षमता आणि करिअरसाठीची तयारी अधिक सक्षम करणे, हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. नायक म्हणाले, देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचा 'देशपांडे स्किलिंग' हा महत्त्वपूर्ण उपक्रम असून त्याचे मुख्यालय हुबळी (कर्नाटक) येथे आहे. ग्रामीण तसेच निमशहरी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. प्रामुख्याने आवश्यक व्यक्तिमत्त्व विकास व औद्योगिक कौशल्ये या अनुषंगाने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील.

या सामंजस्य करारावर नायक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संचालक डॉ. सागर डेळेकर, रवी चव्हाण, एम. बी. शेख, रवी डोळी, डॉ. हेमराज यादव, सुभाष माने यांच्यासह तिन्ही संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले विद्यापीठाच्या 'कुशल, सक्षम आणि उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्मिती' या उद्दिष्टाला निश्चितच बळकटी तसेच ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी देण्याच्या कामी हा करार महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

25 JUL 2026

तरुण भारत

# राजर्षी शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय आविष्कार कार्यशाळा

प्रतिनिधी, कोल्हापूर

स्पर्धेत टिकण्यासाठी सतत नाविन्याचा ध्यास हवा. अशा ध्येयवेड्या संशोधकांसाठी आविष्कार स्पर्धा एक चालना देणारा मंच आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. घाणे यांनी व्यक्त केले.


राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार कार्यशाळेत बोलत ते होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले होते. कार्यशाळेस आविष्कार समितीचे जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. आतिग्रे, डॉ. पी. के. पवार, डॉ. एस. डी. डेळेकर, सुलेखा अडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

अविष्कार ही स्पर्धा मानवशास्त्र आणि भाषा, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान व वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र अशा सहा विभागामध्ये संपन्न झाली. यासाठी डॉ. पी. के. पवार, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. टी. डी. डोंगळे, सौ. डॉ. के. एस. वडराळे, यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संयोजक डॉ. एस. डी. शेख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शामल हुंबरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. व्ही. गायकवाड यांनी आभार मानले.

25 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

# गोविंदराव टेंबे महाराष्ट्राचे उपेक्षित साहित्यिक : सुधीर पोटे



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

गोविंदराव टेंबे हे महाराष्ट्राचे 'उपेक्षित साहित्यिक' आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ गायक व संगीततज्ज्ञ सुधीर पोटे यांनी आज केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'गोविंदराव टेंबे कार्यकर्तृत्व' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.

सुधीर पोटे म्हणाले की, गोविंदराव टेंबे यांनी मराठीत पहिल्यांदा लक्षण गीतांची निर्मिती केली. तसेच त्यांनी स्वतंत्र स्वररागदारी निर्माण केल्या. भारतीय सांगितिक परंपरेत टेंबे यांचे मोलाचे योगदान आहे. ही गीते आणि रागदारीच्या माध्यमातून त्यांनी संगीताबरोबरच साहित्यसेवाही केली आहे. त्याची अपेक्षित दखल घेण्यात आली नाही. टेंबे यांच्या या योगदानाचा नव्याने अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे पोटे यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, कोल्हापूरचा सांगितिक-सांस्कृतिक दस्तऐवज म्हणून गोविंदराव टेंबे यांच्या कार्याकडे, योगदानाकडे पाहायला हवे. कोल्हापूरच्या कलाक्षेत्राची ओळख गोविंदराव टेंबे यांनी सर्वदूर पसरवली. त्याविषयीही आपण कृतज्ञ असायला हवे. त्यांच्या योगदानाची दखल नव्या पिढीने घ्यायला हवी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. सुखदेव एकल यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मराठी अधिविभागातील संशोधक विद्यार्थी आणि एम. ए. चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 5 JUL 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकमान्य टिळक जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. दादा ननवरे, दिपाली कोळी, प्रियांका निकम, यास्मिन मुल्ला, अनुजा घोरपडे, काजल कुंभारदरे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 5 JUL 2026

जनप्रवास

# विद्यापीठांनी महाविद्यालय तसेच विद्यापीठ स्तरावर 'स्पोर्ट्स इकोसिस्टिम' तयार करावी

कोल्हापूर : राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी राज्यातील सर्व राज्य विद्यापीठांमधील क्रीडा विभाग प्रमुख तसेच क्रीडा संचालकांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. विद्यापीठांनी खेळ व क्रीडा प्रकारांना पोषक वातावरण तयार करुन देशासाठी उत्तमोत्तम खेळाडू निर्माण करावे. समर्थ आणि शक्तिशाली राष्ट्र बनवण्यासाठी खेळ हा महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्राकडे क्रीडा विकासाची मोठी ताकद आहे. राज्याने अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवले आहेत. खेळ आता 'अभ्यासेतर उपक्रम' नसून 'सहअभ्यासक्रम' झाले आहेत. विद्यापीठांनी महाविद्यालय तसेच विद्यापीठ स्तरावर 'स्पोर्ट्स इकोसिस्टिम' तयार करावी, असा संदेश राज्यपालांनी दिला.

25 JUL 2026

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd 1962 "A++"Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## E-Tender Notice No. SUK_2026-27/211

Shivaji University invites online tenders for **Printing of Question Papers, Uploading DTP Files on SRPD Portal, Degree Certificate-Pre Printing Stationery**. Relevant tender documents are available on web-site **http://mahatenders.gov.in**"" Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL. University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt. 06/08/2026 upto 5-00 p.m.**

SU/Stores
Date :-25 /07/2026

**Dr. V. N. Shinde**
Registrar

जनसंपर्क कक्ष

25 JUL 2026

पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd 1962 "A++" Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

### E-Tender Notice No. SUK_2026-27/211

Shivaji University invites online tenders for **Printing of Question Papers, Uploading DTP Files on SRPD Portal, Degree Certificate-Pre Printing Stationery**. Relevant tender documents are available on web-site **http://mahatenders.gov.in**"" Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL. University reserves Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of Tender submission dt. 06/08/2026 upto 5-00 p.m.**

SU/Stores
Date :-25 /07/2026

**Dr. V. N. Shinde**
Registrar